# महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब संयुक्त परीक्षा

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील :-**

**१.१** राज्य शासनाच्या सेवेतील खालील संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात :-

| अ. क्र. | संवर्ग/पदाचे नांव | संवर्ग | वेतनसंरचना (Pay Matrix) | उच्च पदावर पदोन्नतीच्या संधी | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | **सहायक कक्ष अधिकारी** | अराजपत्रित गट-ब | S-१४ : ३८६००-१२२८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | ज्येष्ठता व पात्रतेनुसार कक्ष अधिकारी व त्यावरील पदे. | फक्त बृहन्मुंबईतील विविध मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय |
| २ | **राज्य कर निरीक्षक** | | | ज्येष्ठता व पात्रतेनुसार राज्य कर अधिकारी व त्यावरील पदे. | राज्य शासनाच्या राज्य कर विभागाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात. |
| ३ | **पोलीस उप निरीक्षक** | | | ज्येष्ठता व पात्रतेनुसार सहायक पोलीस निरीक्षक व त्यावरील पदे. | राज्य शासनाच्या पोलीस दलाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात |

**१.२** शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात/अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येतील.

**२. परीक्षेचे टप्पे :-**

**२.१** प्रस्तुत तीनही संवर्ग/पदावरील भरतीकरीता एकच संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येईल.

**२.२** संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन, अर्ज करणा-या उमेदवारांकडून ते यांपैकी एक, दोन किंवा तीनही संवर्ग/पदांसाठी बसू इच्छितात किंवा कसे, याबाबत विकल्प (Option) घेण्यात येईल.

**२.३** संबंधित संवर्ग/पदाकरीता उमेदवाराने दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधित पद भरतीकरीता अर्ज समजण्यात येईल/येतील.

**२.४** संयुक्त पूर्व परीक्षेस अर्ज करताना दिलेला विकल्प तसेच, भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे, संबंधित संवर्ग/पदाच्या मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करुन, सामाईक पूर्व परीक्षेच्या आधारे तीनही संवर्ग/पदांकरीता स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येईल.

**२.५** संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित संवर्ग/पदाकरीता घेण्यात येणा-या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांची स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**२.६** तीनही संवर्ग/ पदांकरीता मुख्य परीक्षेचा पेपर क्रमांक १ सामाईक असेल व सदर पेपरची परीक्षा एकाच दिवशी एकत्र घेण्यात येईल.

**२.७** मुख्य परीक्षेचा पेपर क्रमांक २ मात्र संबंधित संवर्ग/पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन स्वतंत्रपणे घेण्यात येईल.

**२.८** संबंधित संवर्ग/पदाच्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमाच्या आधारे पात्र उमेदवारांची मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**२.९** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी पूर्व परीक्षा घेण्यात येते. पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते.

**२.१०** पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणार नाहीत.

**२.११** पोलीस उपनिरीक्षक संवर्ग/पदावरील निवडीसाठी घेण्यात येणा-या मुख्य परीक्षेकरीता आयोगाने विहित केलेले किमान किंवा अधिक गुण मिळविणारे उमेदवार शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरतात.

**२.१२** शारीरिक चाचणीमध्ये किमान ६० टक्के गुण मिळविणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतात.

**२.१३** पोलीस उपनिरीक्षक संवर्ग/पदावरील भरतीकरीता जाहिरातीतील तरतुदीनुसार विहित अटींची पूर्तता करणा-या व मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ कागदपत्रे सादर करणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येते.

**२.१४** संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करताना दिलेला/ले विकल्प व माहिती अंतिम समजण्यात येईल व त्याच्या आधारेच पुढील भरतीप्रक्रिया होईल.

**२.१५** संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करताना दिलेला/ले विकल्प व अर्जामध्ये नमूद माहिती यामध्ये बदल करण्याबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करता येणार नाही.

**३. उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन :-**

**३.१** वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना, उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच, प्रत्येक चुकीच्या उत्तरामागे २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**३.२** एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५ % किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**३.३** एखादा प्रश्न अनुत्तरित असेल तर अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

**३.४** वरीलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच गणण्यात येईल व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.

**४.पात्रता:-**

**४.१** भारतीय नागरिकत्व

**४.२ वयोमर्यादा:-**

| अ. क्र. | संवर्ग | वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | किमान | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार |
| | | | अमागास / मागासवर्गीय / आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ/ आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय / आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय / आ. दु. घ. | |
| १ | सहायक कक्ष अधिकारी | जाहिरातीमध्ये नमूद दिनांक | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| २ | राज्य कर निरीक्षक | | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | | १९ | ३१ | ३४ | ३६ | ३६ | ३६ | ३६ | अपात्र |

**४.३** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल करण्यात येणार नाही.

**४.४ अर्हता :-**

**४.४.१ शैक्षणिक अर्हता :-**

**४.४.१.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने विहित केलेली समतुल्य अर्हता.

**४.४.१.२** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**४.४.१.३** पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**४.४.१.४**अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेचा अर्ज/माहिती स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यंत पूर्ण केली असली पाहिजे.

**४.४.२ शारीरिक अर्हता :-**

**४.४.२.१** पोलीस उपनिरीक्षक पदासाठी विकल्प नमूद करणा-या उमेदवारांकडे उपरोक्त अर्हतेसोबत खालीलप्रमाणे किमान शारीरिक अर्हता असणे आवश्यक आहे :-

| पुरुष | महिला |
|---|---|
| (१) उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) छाती - न फुगविता ७९ से.मी.<br>फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी. आवश्यक | उंची - १५७ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |

**४.४.२.२** पोलीस उपनिरीक्षक पदावरील नियुक्तीकरीता शिफारस झालेल्या उमेदवारांची शारीरिक मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. वरीलप्रमाणे विहित शारीरिक पात्रता नसल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**४.५ परीक्षेच्या संधी :-**

**४.५.१** आयोगामार्फत आयोजित होणाऱ्या विभिन्न स्पर्धा परीक्षांमध्ये भाग घेणाऱ्या उमेदवारांस संधीची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे:-

(१) अराखीव (खुला) उमेदवारांस कमाल सहा संधी उपलब्ध राहतील.

(२) अनुसुचित जमाती व अनुसुचित जाती प्रवर्गातील उमेदवारांस कमाल संधीची मर्यादा लागू राहणार नाही.

(३) खुला (अराखीव)/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील दिव्यांग व अनाथ उमेदवारांकरीता कमाल नऊ संधी उपलब्ध राहतील.

(४) उर्वरित मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांस कमाल नऊ संधी उपलब्ध राहतील.

**४.५.२** उमेदवारांची संधीची संख्या खाली नमूद केल्यानुसार लागू राहतील:

( १) उमेदवाराने पूर्व परीक्षेत भाग घेतल्यास, ही संबंधित स्पर्धा परीक्षेची संधी समजली जाईल.

(२) उमेदवार कोणत्याही कारणास्तव परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरल्यास किंवा त्याची उमेदवारी रद्द झाल्यास तरीही त्याची परीक्षेस उपस्थिती संधी गणली जाईल.

(३) प्रत्येक परीक्षेसाठी संधीची गणना स्वतंत्रपणे करण्यात येईल.

(४) संबंधित संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमातील वयोमर्यादेच्या गणनेसह इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

(५) शासनाकडून संबंधित सामाजिक प्रवर्गाकरीताची विहित केलेल्या उच्च वयोमर्यादेपर्यंतच उमेदवारास त्यांना देय असलेल्या संधीचा फायदा घेता येईल.

## ५. शुल्क (फी) :-

**५.१** प्रस्तुत भरतींकरीता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | शुल्क रुपये | |
|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्ग/आ.दु.घ./अनाथ |
| १ | संयुक्त पूर्व परीक्षा | ३९४ | २९४ |
| २ | मुख्य परीक्षा (प्रत्येकी) | ५४४ | ३४४ |

**५.२** विमुक्त जाती (अ),भटक्या जमाती (ब),भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड),विशेष मागासप्रवर्ग, इतर मागास प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रिमी लेअर) मोडणाऱ्या उमेदवारांनी त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**५.३** उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रिमी लेअर) उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

## ६. संयुक्त पूर्व परीक्षा : -

### ६.१ परीक्षा योजना :-

**(१) प्रश्नपत्रिका :** एक - प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| विषय व संकेतांक | प्रश्नांची संख्या | एकूण गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| सामान्य क्षमता चाचणी (संकेतांक ०१२) | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**६.२ अभ्यासक्रम :-** प्रस्तुत संयुक्त पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| (१) | **चालु घडामोडी -** जागतिक तसेच भारतातील |
| (२) | **नागरिकशास्त्र -** भारताच्या घटनेचा प्राथमिक अभ्यास, राज्य व्यवस्थापन (प्रशासन) ग्राम व्यवस्थापन (प्रशासन) |
| (३) | **इतिहास -** आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास |
| (४) | **भूगोल (महाराष्ट्राच्या भूगोलाच्या विशेष अभ्यासासह) -** पृथ्वी, जगातील विभाग, हवामान, अक्षांश-रेखांश, महाराष्ट्रातील जमिनीचे प्रकार, पर्जन्यमान, प्रमुख पिके, शहरे, नद्या, उद्योगधंदे इत्यादी. |
| (५) | **अर्थव्यवस्था —**<br>**भारतीय अर्थव्यवस्था -** राष्ट्रीय उत्पन्न, शेती, उद्योग, परकीय व्यापार, बँकिंग, लोकसंख्या, दारिद्रय व बेरोजगारी, मुद्रा आणि राजकोषीय नीति, इत्यादी<br>**शासकीय अर्थव्यवस्था -** अर्थसंकल्प, लेखा, लेखापरीक्षण, इत्यादी |
| (६) | **सामान्य विज्ञान -** भौतिकशास्त्र (Physics), रसायनशास्त्र (Chemistry), प्राणिशास्त्र (Zoology), वनस्पतीशास्त्र (Botany), आरोग्यशास्त्र (Hygine) |
| (७) | **बुद्धिमापन चाचणी व अंकगणित**<br>**बुद्धिमापन चाचणी -** उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करू शकतो हे आजमावण्यासाठी प्रश्न<br>**अंकगणित -** बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, दशांश, अपूर्णांक व टक्केवारी. |

### ६.३ परीक्षा केंद्र :-

**६.३.१** संयुक्त पूर्व परीक्षा खालील ठिकाणी घेण्यात येईल :-

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| अहमदनगर | ११ |
| अकोला | १२ |
| अलिबाग | १३ |
| अमरावती | १४ |
| औरंगाबाद | १५ |
| बीड | १६ |
| भंडारा | १७ |
| बुलढाणा | १८ |
| चंद्रपूर | १९ |
| धुळे | २० |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| गडचिरोली | २१ |
| गोंदिया | २२ |
| हिंगोली | २३ |
| जळगाव | २४ |
| जालना | २५ |
| कोल्हापूर | २६ |
| कुडाळ | २७ |
| लातूर | २८ |
| मुंबई (मध्य) | ३० |
| मुंबई (पश्चिम) | ३१ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| नागपूर | ३२ |
| नांदेड | ३३ |
| नंदुरबार | ३४ |
| नाशिक | ३५ |
| उस्मानाबाद | ३६ |
| परभणी | ३७ |
| पुणे | ३८ |
| रत्नागिरी | ३९ |
| सांगली | ४० |
| सातारा | ४१ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| सोलापूर | ४२ |
| ठाणे | ४३ |
| वर्धा | ४४ |
| वाशिम | ४५ |
| यवतमाळ | ४६ |
| पालघर | ४७ |
| नवी मुंबई | ४८ |

**६.३.२** उपरोक्त जिल्हा केंद्रांमधून कोणतेही एक केंद्र ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**६.३.३** उपरोक्त जिल्हा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**६.३.४** विहित पध्दतीने ऑनलाईन माहिती सादर करताना उमेदवारांने निवडलेले जिल्हाकेंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध परीक्षा उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**६.३.५** एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**६.३.६** एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**६.३.७** वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्याआधारे संबंधित महसुली मुख्यालयाच्या जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**६.४ पूर्व परीक्षेचा निकाल :**

**६.४.१** भरावयाच्या प्रत्येक संवर्ग/पदाकरीता स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल.

**६.४.२** संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज करताना उमेदवारांकडून घेतलेल्या संवर्गाच्या विकल्पाच्या आधारे तसेच प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे संबंधित संवर्गाकरीता (सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक) भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे १२ पट उमेदवार संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील, अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची स्वतंत्र सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. तद्नंतर, दुस-या टप्प्यात प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी १२ पट उमेदवार उपलब्ध होतील, अशा रीतीने सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, अशा पध्दतीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी दुस-या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या आरक्षित पदावरच निवडी/शिफारशीसाठी पात्र असतील.

**६.४.३** अराखीव (खुला) पदांकरींता निश्चित करण्यात आलेल्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी अराखीव(खुला) पदासाठी विचारात घेतली जाईल. अराखीव (खुला) पदासाठी निश्चित करण्यात आलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदावरील निवडीसाठी पात्र ठरतील.

**६.४.४** प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी संयुक्त पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.४.५** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**६.४.६** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल व निकाल जाहीर झाल्याबाबतची माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल. तथापि, लघुसंदेशाद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्याची सुविधा ही अतिरिक्त सुविधा असून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला निकाल हाच अधिकृत मानण्यात येईल.

**६.४.७** संयुक्त पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६.४.८** जाहिरातीस अनुसरून पूर्व परीक्षेकरीता अर्जाद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने कोणत्याही टप्प्यावर कागदपत्रे/पुरावा सादर करणे अनिवार्य आहे.

**७. मुख्य परीक्षा :-**

**७.१** प्रत्येक पदाकरीता विहित करण्यात आलेल्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमानुसार स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**७.२ परीक्षेस प्रवेश :-**

**७.२.१** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून निश्चित केलेल्या सीमांकन रेषा व मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरण्याऱ्या तसेच जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदींनुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**७.२.२** मुख्य परीक्षेकरीता आयोगाच्या कार्यालयाकडून अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून विहित करण्यात आलेल्या पद्धतीने जिल्हा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**७.२.३** संबंधित संवर्ग/पदाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारास प्रत्येक संवर्गासाठी विहित पद्धतीने स्वतंत्रपणे अर्ज सादर करुन प्रत्येक संवर्ग/पदाच्या परीक्षेसाठी स्वतंत्र विहित परीक्षा शुल्क भरावे लागेल.

७.२.४ प्रस्तुत पदाच्या संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसल्यास व शैक्षणिक अर्हता, मुख्य परीक्षेकरिता आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

**७.३ परीक्षा योजना :**

**७.३.१ मुख्य परीक्षेचे टप्पे –**

**(१)लेखी परीक्षा**

**(२)पोलीस उपनिरीक्षक पदाकरीता लेखी परीक्षा (४०० गुण) + शारीरिक चाचणी (१००गुण) + मुलाखत (४०गुण)**

**७.३.२ लेखी परीक्षेचे एकूण गुण ४००**

**(१) संयुक्त पेपर क्रमांक – १ (२०० गुण)**

**(२) प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र पेपर क्रमांक - २ (प्रत्येकी २०० गुण)**

**७.३.३ प्रश्नपत्रिकांची संख्या :- दोन; पैकी पेपर क्रमांक १ तीनही पदाकरीता संयुक्त, पेपर क्रमांक २ तीनही पदाकरीता स्वतंत्र.**

**७.३.४ सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा संयुक्त पेपर क्रमांक - १**

**७.३.४.१ प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-**

| पेपर क्रमांक व संकेतांक | विषय | गुण | प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ (संकेतांक ०१४) | मराठी | १०० | ५० | मराठी - बारावी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | ६० | ३० | इंग्रजी - पदवी | इंग्रजी | | |
| | सामान्य ज्ञान | ४० | २० | पदवी | मराठी व इंग्रजी | | |

**७.३.४.२ अभ्यासक्रम :-** सविस्तर अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे :-

| पेपर क्रमांक - १ मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान | |
|---|---|
| १ | **मराठी :-**<br>सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाकप्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे |
| २ | **इंग्रजी : -**<br>Common Vocabulary, Sentence structure, Grammar, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage. |
| ३ | **सामान्य ज्ञान :-**<br>**३.१ चालु घडामोडी** - जागतिक तसेच भारतातील. |
| | **३.२ माहिती अधिकार अधिनियम -२००५ व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५** |
| | **३.३ संगणक व माहिती तंत्रज्ञान** - आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळया क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, डाटा कम्युनिकेशन, नेटवर्कींग आणि वेब टेक्नॉलॉजी, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, नविन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळया सेवा सुविधांची माहिती मिळण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, शासनाचे कार्यक्रम, जसे मिडीया लॅब एशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, सामुहिक माहिती केंद्र इत्यादी, माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मुलभूत प्रश्न व त्याचे भवितव्य. |

**७.३.५ सहायक कक्ष अधिकारी मुख्य परीक्षा स्वतंत्र पेपर क्रमांक – २**

**७.३.५.१** प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| पेपर क्रमांक व संकेतांक | विषय | गुण | प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ ( संकेतांक ५०३) | सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान | २०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**७.३.५.१ अभ्यासक्रम :-** सविस्तर अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| **पेपर क्रमांक - २**<br>**सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.** | |
| १ | **बुध्दिमत्ता चाचणी** |
| २ | **महाराष्ट्राचा इतिहास** - सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५-१९४७), महत्वाच्या व्यक्तींचे काम स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम / भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी. |
| ३ | **महाराष्ट्राचा भूगोल** - महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, हवामान (Climate) , पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत व डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती- वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल- लोकसंख्या (Population), migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परीणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्ट्या व त्यांचे प्रश्न. |
| ४ | **भारतीय राज्यघटना** - घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्टये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे-शिक्षण, युनीफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका, राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ-Role, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ- विधानसभा, विधानपरिषद व त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व Role, विधी समित्या. |
| ५ | **राजकीय यंत्रणा (शासनाची रचना अधिकार व कार्ये) केंद्र सरकार केंद्रिय विधिमंडळ आणि राज्य सरकार व प्रशासन (महाराष्ट्राचा विशेष संदर्भ)** |
| ६ | **जिल्हा प्रशासन, ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन** |
| ७ | **न्यायमंडळ:-**<br>न्यायमंडळाची रचना, एकात्मिक न्यायमंडळ- कार्ये, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाची भूमिका व अधिकार, दुय्यम न्यायालये- लोकपाल, लोकायुक्त आणि लोक न्यायालय, सांविधानिक आदेशाचे रक्षण करणारे न्यायमंडळ, न्यायालयीन सक्रियता, जनहित याचिका. |
| ८ | **नियोजन** - प्रक्रिया, प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहाव्या पंचवार्षिक योजनेचा आढावा, मुल्यांकन, सामाजिक व आर्थिक विकासाचे निर्देशफलक, राज्य आणि स्थानिक पातळीवरील नियोजन, विकेंद्रीकरण, ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती , भारतीय अर्थव्यवस्था, क्षेत्रीय विकासाचा कल व सेवा क्षेत्राची रुपरेषा, भारतीय अर्थव्यवस्थेच्या समोरील आव्हाने, गरीबी, बेरोजगारी आणि प्रादेशिक असमतोल. |

**७.३.६ राज्य कर निरीक्षक मुख्य परीक्षा — स्वतंत्र पेपर क्रमांक — २**

**७.३.६.१** प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| पेपर क्रमांक व संकेतांक | विषय | गुण | प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २<br>( संकेतांक ५०४) | सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान | २०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**७.३.६.२ अभ्यासक्रम :-** सविस्तर अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| **पेपर क्रमांक - २**<br>**सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.** | |
| १ | **बुध्दिमत्ता चाचणी** |
| २ | **महाराष्ट्राचा भूगोल** - महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, हवामान (Climate), पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत व डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती- वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल- लोकसंख्या (Population), Migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्ट्या व त्यांचे प्रश्न. |
| ३ | **महाराष्ट्राचा इतिहास** - सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५-१९४७), महत्वाच्या व्यक्तींचे काम स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम / भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी. |

| | |
|---|---|
| ४ | **भारतीय राज्यघटना** - घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्टये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे-शिक्षण, युनीफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका, राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ-Role, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ- विधानसभा, विधानपरिषद व त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व Role, विधी समित्या. |
| ५ | **नियोजन** - प्रक्रिया, प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहाव्या पंचवार्षिक योजनेचा आढावा, मुल्यांकन, सामाजिक व आर्थिक विकासाचे निर्देशफलक, राज्य आणि स्थानिक पातळीवरील नियोजन, विकेंद्रीकरण, ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती , भारतीय अर्थव्यवस्था, क्षेत्रीय विकासाचा कल व सेवा क्षेत्राची रुपरेषा, भारतीय अर्थव्यवस्थेच्या समोरील आव्हाने, गरीबी, बेरोजगारी आणि प्रादेशिक असमतोल. |
| ६ | **शहरी व ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास** - पायाभूत सुविधांची गरज व महत्व, सामाजिक व आर्थिक पायाभूत सुविधांचा विकास आणि वाढ - जसे उर्जा, पाणीपुरवठा व मलनि:सारण, गृह, परिवहन (रस्ते, बंदर, इत्यादी) दळणवळण (पोस्ट व तार, दूरसंचार) रेडीओ, टि.व्ही. इंटरनेट क्रायसिस, भारतातील इन्फ्रास्ट्रक्चरचे प्रश्न व या संबंधीचे धोरण व त्यावरील पर्याय; खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील भागीदारी, एफ.डी. आय. आणि इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट, इन्फ्रास्ट्रक्चर विकासाचे खाजगीकरण, राज्य व केंद्र सरकारचे इन्फ्रास्ट्रक्चर विकासाचे धोरण, ग्रामीण व शहरी भागातील परिवहन व गृह या विषयीचे प्रश्न व त्यावरील केंद्र व राज्य सरकारचे कार्यक्रम व उपक्रमशिलता. |
| ७ | **आर्थिक सुधारणा व कायदे** - पार्श्वभूमी, उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण संकल्पना व त्याचा अर्थ आणि व्याप्ती, मर्यादा, केंद्र व राज्य स्तरावरील आर्थिक सुधारणा, WTO, तरतुदी आणि सुधारणा आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील अपेक्षित परिणाम, प्रश्न व समस्या, GST. राज्य कर, VAT, WTO, इत्यादी शी संबंधीत कायदे/नियम. |
| ८ | **आंतरराष्ट्रीय व्यापार व आंतरराष्ट्रीय भांडवल चळवळ** - जागतिकीकरणाच्या युगातील सूत्र व कल, वाढ, रचना आणि भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची दिशा, भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापाराचे धोरण, निर्यातीतील वाढ, WTO आणि आंतरराष्ट्रीय व्यापार विदेशी भांडवलाचा अंतप्रवाह, रचना व वाढ, FDI व्यापार, बहुआंतरराष्ट्रीय भांडवल पुरविणा-या संस्था, IMF जागतिक बँक, IDA इंटरनॅशनल क्रेडीट रेटींग. |
| ९ | **सार्वजनिक वित्त व्यवस्था** - महसुलाचे साधन, टॅक्स , नॉनटॅक्स, भारतातील केंद्र व राज्यातील सार्वजनिक ऋण, केंद्र व राज्याची सार्वजनिक खर्च वाढ, सार्वजनिक खर्च सुधारणा कामावर आधारित अर्थसंकल्प, शुन्याधारित अर्थसंकल्प, भारतातील करसुधारणा आढावा, राज्य पातळीवरील करसुधारणा VAT सार्वजनिक ऋण वाढ, रचना आणि भार, राज्याची कर्जबाजारीपणाची केंद्राला समस्या, राजकोषीय तुट, संकल्पना, तुटीचे नियंत्रण, केंद्र, राज्य व रिझर्व्ह बँकेचे उपक्रम, भारतातील राजकोषीय सुधारणा, केंद्र व राज्यस्तरावरील आढावा. |

### ७.३.७ पोलीस उप निरीक्षक मुख्य परीक्षा — स्वतंत्र पेपर क्रमांक — २

**७.३.७.१** प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| पेपर क्रमांक व संकेतांक | विषय | गुण | प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २<br>( संकेतांक ५०५) | सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान | २०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**७.३.७.२ अभ्यासक्रम :-** सविस्तर अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे :-

| **पेपर क्रमांक - २**<br>**सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.** | |
|---|---|
| १ | **बुध्दिमत्ता चाचणी** |
| २ | **महाराष्ट्राचा भूगोल** - महाराष्ट्राच्या रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, हवामान (Climate), पर्जन्यातील विभागावर बदल, नद्या, पर्वत, डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकिय विभाग, नैसर्गिक संपत्ती - वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल - लोकसंख्या (Population), Migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्ट्या व त्यांचे प्रश्न, संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान. |
| ३ | **महाराष्ट्राचा इतिहास** - सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५- १९४७), महत्वाच्या व्यक्तींचे काम, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम/भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळ. |

| | |
|---|---|
| ४ | **भारतीय राज्यघटना** - घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे/ठळक वैशिष्टये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे-शिक्षण, युनिफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका. |
| ५ | **मानवी हक्क व जबाबदाऱ्या** - संकल्पना- आंतरराष्ट्रीय मानवी हक्क मानक, त्यासंदर्भातील भारतीय राज्यघटनेतील तरतूद, भारतातील मानवी हक्क व जबाबदा-या यंत्रणेची अंमलबजावणी व संरक्षण, भारतातील मानवी हक्क चळवळ, मानवी हक्कापासून वंचित राहण्याच्या समस्या, गरीबी, निरक्षरता, बेकारी, सामाजिक- सांस्कृतिक- धार्मिक प्रथा यासारख्या अडचणी, (हिंसाचार, भ्रष्टाचार, दहशतवाद, कामगारांचे शोषण, संरक्षित गुन्हेगारी, इत्यादी.) लोकशाही व्यवस्थेतील एकमेकांचे हक्क आणि मानवी प्रतिष्ठा व एकतेचा आदर करण्यासंबंधी प्रशिक्षणाची गरज व महत्व, नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम १९८९, हुंडाबंदी अधिनियम १९६१, महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान. |
| ६ | **महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१(Maharashtra Police Act, 1951)** |
| ७ | **भारतीय दंड संहिता, १८६० (Indian Penal Code, 1860)** |
| ८ | **फौजदारी प्रक्रिया संहिता — १९७३ (Criminal Procedure Code , 1973)** |
| ९ | **भारतीय पुरावा अधिनियम १८७२ ( Indian Evidence Act, 1872 )** |

**७.४ परीक्षा केंद्र :**

**७.४.१** प्रस्तुत सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक तसेच पोलीस उपनिरीक्षक पदावरील भरतीकरीता मुख्य लेखी परीक्षा खालील सहा ठिकाणी घेण्यात येतील :-

| जिल्हा केंद्र | जिल्हा केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| (१)अमरावती | **१४** |
| (२)औरंगाबाद | **१५** |
| (३) मुंबई | **३०** |

| जिल्हा केंद्र | जिल्हा केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| (४) नागपूर | **३२** |
| (५) नाशिक | **३५** |
| (६) पुणे | **३८** |

**७.४.२** उपरोक्त जिल्हा परीक्षा केंद्रांमधून कोणतेही एक केंद्र संबंधित पदाच्या मुख्य परीक्षेकरिता माहिती सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**७.४.३** उपरोक्त जिल्हा परीक्षा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**७.४.४** विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**७.४.५** एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रावर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**७.४.६** एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**७.४.७** वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्याआधारे संबंधित महसुली मुख्यालयाच्या जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**८. लेखी परीक्षेचा निकाल :-**

**८.१ संयुक्त पेपर क्रमांक-१ तसेच प्रत्येक संवर्ग/ पदाकरीता स्वतंत्रपणे घेण्यात येणाऱ्या पेपर क्रमांक-२ चे गुण एकत्रित करून प्रत्येक परीक्षेची निकाल प्रक्रिया स्वतंत्रपणे राबविण्यात येईल.**

**८.२** पोलीस उपनिरीक्षक पदाकरीता भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी सुमारे ४ पट उमेदवार शारीरिक चाचणीसाठी उपलब्ध होतील,अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल.

**८.३** गुणांची सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी तसेच महिला, दिव्यांग, खेळाडू व अनाथ इत्यादीं आरक्षित प्रकारासाठी वेगवेगळी असेल.

**८.४** प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे ते विहित अटींची पूर्तता करतात, असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शारीरिक चाचणीसाठी (फक्त पोलीस उपनिरीक्षक पदाकरीता ) पात्र समजण्यात येईल.

८.५ शारीरिक चाचणीकरीता पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलद्वारे आणि मोबाईल क्रमांकावर लघुसंदेश द्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल. तथापि, वैयक्तिकरित्या लघुसंदेशाद्वारे कळविण्याची सुविधा ही अतिरिक्त सुविधा असून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला निकाल हाच अधिकृत मानण्यात येईल.

८.६ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवार तसेच महिला व पात्र खेळाडू उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अराखीव (खुला) पदावरील निवड/शिफारसीसाठी पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**९. शारीरिक चाचणी :-**

९.१ फक्त पोलीस उपनिरीक्षक पदाकरीता शारीरिक चाचणी घेण्यात येईल.

९.२ लेखी परीक्षेत आयोगाने निश्चित केलेल्या सीमांकन रेषेएवढे किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना शारीरिक चाचणीसाठी बोलविण्यात येईल.

९.३ उंची व छातीविषयक विहित मोजमापाच्या अटी पूर्ण करणा-या उमेदवारांचीच शारीरिक चाचणी घेण्यात येईल. सदर चाचणी पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र असेल.

९.४ शारीरिक चाचणीच्या वेळी उंची व छातीविषयक विहित मोजमापाच्या अटी पूर्ण न करणा-या उमेदवारांची उंची / छाती मापनाविषयी काही तक्रार असल्यास त्यांनी त्याच दिवशी आयोगाकडे आपला तक्रार अर्ज सादर करणे आवश्यक आहे. याबाबत योग्य तो विचारविनिमय करुन अपात्र उमेदवारांच्या उंची / छातीचे फेरमापन घेण्याकरिता उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

९.५ आयोगाच्या वेळापत्रकानुसार अशा उमेदवारांच्या उंची व छातीविषयक फेरमोजमापनाकरिता दिनांक, वेळ व ठिकाण निश्चित करण्यात येईल.

९.६ फेरमापनाच्या अनुषंगाने पात्र ठरणा-या उमेदवारांची शारीरिक चाचणी त्याच दिवशी घेण्यात येईल. तसेच शारीरिक चाचणीत पात्र ठरणा-या उमेदवारांची मुलाखत त्याच दिवशी अथवा स्वतंत्रपणे घेण्यात येईल.

९.७ शारीरिक चाचणी एकूण १०० गुणांची असेल.

९.८ शारीरिक चाचणीचे गुण अर्हताकारी (Qualifying) करण्यात आले असून शारीरिक चाचणीमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी एकूण गुणांपैकी किमान ६० टक्के गुण(म्हणजेच ६० गुण) मुलाखतीस पात्र होण्यासाठी आवश्यक राहतील. तसेच या गुणांचा अंतिम गुणवत्तेकरीता/अंतिम निवडीकरीता विचार होणार नाही.

९.९ सर्व शारीरिक चाचणीतील एकूण गुणांची बेरीज अपूर्णांकात असल्यास ती अपूर्णांकातच ठेवून, शारीरिक चाचणीचा निकाल तयार करण्यात येईल.

९.१० वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाआधारे पात्र ठरणा-या उमेदवारांना शारीरिक चाचणीसाठी आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित दिनांकास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**९.११ शारीरिक चाचणीचा तपशील :-**

| पुरुषांसाठी | महिलांसाठी |
|---|---|
| (१) गोळाफेक-वजन-७.२६० कि.ग्रॅ. - कमाल गुण - १५ | (१) गोळाफेक-वजन-४ कि.ग्रॅ.- कमाल गुण - २० |
| (२) पुल अप्स - कमाल गुण - २० | (२) धावणे (४०० मीटर्स ) - कमाल गुण - ५० |
| (३) लांब उडी - कमाल गुण - १५ | (३) लांब उडी - कमाल गुण - ३० |
| (४) धावणे (८०० मीटर ) - कमाल गुण - ५० | |

९.१२ शारीरिक चाचणीच्या सरावासाठी उमेदवार राज्यातील पोलीस कवायत मैदानांचा उपयोग करू शकतील आणि पोलीस मुख्यालयातील पोलीस उपायुक्तांच्या, तसेच पोलीस अधिक्षकांच्या परवानगीने निदेशकांची मदत घेऊ शकतील.

९.१३ शारीरिक चाचणीमध्ये किमान ६० टक्के गुण मिळविणा-या उमेदवारांची मुलाखत आयोगाने निश्चित केलेल्या दिनांकास व विहित ठिकाणी घेण्यात येईल. त्याकरिता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**१०. मुलाखत :-**

१०.१ फक्त पोलीस उपनिरीक्षक पदाकरीता मुलाखत घेण्यात येईल. मुलाखत **४०** गुणांची असेल.

१०.२ शारीरीक चाचणीच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

१०.३ मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

१०.४ विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**११. निकाल :-**

११.१ पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या निवडीकरीता संबंधित मुख्य परीक्षा (संयुक्त पेपर क्रमांक-१ व स्वतंत्र पेपर क्रमांक-२) आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल.

**११.२** सहायक कक्ष अधिकारी तसेच राज्य कर निरीक्षक पदावरील/निवडीकरीता संबंधित मुख्य परीक्षेमध्ये (संयुक्त पेपर क्रमांक-१ व स्वतंत्र पेपर क्रमांक-२) प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ताक्रमानुसार यादी (Merit List) तयार करण्यात येईल.

**११.३** गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणा-या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार ठरविण्यात येईल.

**१२. शिफारस :-**

**१२.१ "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना "** मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येईल.

**१२.२** सहायक कक्ष अधिकारी तसेच राज्य कर निरीक्षक पदाच्या लेखी परीक्षेमधून पात्र होण्याकरीता शतमत (**Percentile**) पध्दत लागू आहे.

**१२.३** पोलीस उपनिरीक्षक पदाकरीता लेखी परीक्षेमधून शारीरिक चाचणीसाठी पात्र होण्याकरीता शतमत (**Percentile**) पध्दत लागू आहे.

**१२.४** प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवारांच्या एकूण गुणांच्या खालीलप्रमाणे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशीसाठी तसेच शारीरिक चाचणीसाठी पात्र असतील :-

**(१) अमागास- किमान ३५ शतमत**
**(२) मागासवर्गीय -किमान ३० शतमत**
**(३) दिव्यांग - किमान २० शतमत**
**(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू — किमान २० शतमत**
**(५) अनाथ — किमान ३० शतमत**

**१२.५** दिव्यांग अथवा अनाथ अथवा अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू या प्रवर्गाच्या किमान सीमारेषेच्या आधारे शिफारशीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारास कोणतीही एक सवलत घेता येईल.

**१२.६** शिफारसपात्र उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**१२.७** शिफारशीनंतर नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे किंवा नाही, याबाबत उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल

**१३. प्रमाणपत्र पडताळणी :-**

**१३.१** सहायक कक्ष अधिकारी तसेच राज्य कर निरीक्षक संवर्गाच्या संबंधित लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणीसाठी सक्षम प्राधिका-यांकडून बोलविण्यात येईल.

**१३.२**आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/ शासन परिपत्रकातील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे सक्षम प्राधिका-यांकडून तपासली जाईल.

**१३.३** अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी केली जाईल.

**१३.४** विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची शिफारस रद्द करण्यात येईल. तसेच त्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**१३.५** वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी सक्षम प्राधिका-यांकडून निश्चित करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार तसेच सक्षम प्राधिका-याने निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस घेण्यात येतील. त्याकरीता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**१३.६** अर्जातील दाव्यानुसार सक्षम प्राधिका-याकडून करण्यात आलेल्या प्रमाणपत्र पडताळणीच्या आधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच नियुक्ती देण्याची कार्यवाही सक्षम प्राधिका-यांकडून करण्यात येईल.

**१४. उत्तरपत्रिकेची प्रत व इतर तपशील :-**

**१४.१** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीच्या पेपरची उत्तरपत्रिका संबंधित परीक्षेच्या निकालानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे संबंधित उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे खालील तपशीलासह उपलब्ध करून देण्यात येईल :-

(१) मूळ उत्तरपत्रिकेची स्कॅन इमेज
(२) निकालाकरीता गृहित धरलेले गुण
(३) उमेदवार पात्र असलेल्या प्रवर्गाकरीताच्या गुणांची किमान सीमांकन रेषा.

**१४.२** वरील तपशील उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करून दिल्यानंतर याबाबतची माहिती उमेदवारांना संकेतस्थळावर प्रसिद्धीपत्रकाद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

**१५.** प्रस्तुत परीक्षा योजना उमेदवारांना परीक्षेचे स्वरुप समजण्यास सुलभता व्हावी, या हेतूने प्रसिध्द करण्यात येत असून यामधील कोणतीही तरतूद प्रस्तुत परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावली यांमधील तरतूदींशी विसंगत असल्यास त्या-त्यावेळच्या परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय तसेच आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदी ग्राह्य धरण्यात येतील.

दिनांक :- २७ ऑक्टोबर , २०२१

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.